(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

**वनजमिन-चंद्रपूर**

मौजे चिचपल्ली, जि.चंद्रपूर येथे व्यावसायिक बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी ४.९९ हेक्टर झुडपी जंगल वनक्षेत्र वळतेकरणाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एफएलडी-३६१५/प्र.क्र.१९५/फ-१०**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २८/०८/२०१५

**प्रस्तावना -**

विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांनी मौजे चिचपल्ली, जि.चंद्रपूर येथे व्यावसायिक बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी ४.९९ हेक्टर झुडपी जंगल वनक्षेत्र वळतेकरणाचा प्रस्ताव राज्याच्या वन विभागास सादर केला आहे. सदर प्रस्तावास सविस्तर छाननी अंती मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

भारत सरकारच्या आदेश क्रमांक-F.No.११-९/९८/FC दिनांक १३/५/२०११ व १७/५/२०१३ अन्वये राज्यांना दिलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे मौजे चिचपल्ली, जि.चंद्रपूर येथे व्यावसायिक बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम-२ खाली वनजमिन वळतीकरण करण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. Desk-१७/NC/I/ID-१२३८३/४६६/१५-१६, दिनांक १२/०६/२०१५ अन्वये सादर केलेल्या प्रस्तावास तत्त्वत: मंजुरी देत आहे. वनजमिनीचा तपशील खालीलप्रमाणे -

| गावाचे नाव | जिल्हा | सर्व्हे नंबर/गट नंबर | क्षेत्रफळ (हेक्टर) | वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|
| चिचपल्ली | चंद्रपूर | ६/१ | ४.९९ | झुडपी जंगल |
| **एकूण वनजमिन क्षेत्रफळ** | | | **४.९९** | |

२. सदर तत्वत: मंजुरी खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

२) केंद्र शासनाच्या नवीन मार्गदर्शक सूचनेनुसार / सुधारित दरानुसार प्रकल्प यंत्रणेस ४.९९ हेक्टर वनजमिनीच्या नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरावी लागेल.

३) प्रस्तावित वनक्षेत्र वळतेकरण केवळ ४.९९ हेक्टर च्या मर्यादेत असेल.

४) प्रकल्प प्रस्तावामध्ये ज्या कारणासाठी वनजमिन मागणी केलेली आहे त्या कारणाशिवाय इतर कारणासाठी वनजमिनीचा वापर करता येणार नाही.

५) प्रस्तावित वनजमिन ही ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर/संवेदनशील क्षेत्राच्या सीमेपासून ८.७५ कि.मी आतील परिक्षेत्रात असल्याने प्रकल्प यंत्रणेस राज्य शासनाकडून वनजमिन वळतीकरणाचे अंतिम आदेश निगर्मित होण्यापूर्वी राष्ट्रीय हरीत न्यायाधिकरणाची ( जनहीत याचिका क्र.१३५/२०१३, शोभाताई

फडणवीस विरुद्ध महाराष्ट्र शासन, दिनांक १३/०१/२०१४ रोजी दिलेले आदेशांस अनुसरुन) परवानगी घ्यावी लागेल.

६) काम करत असताना मजूर/कर्मचारी यांच्याकडून वनक्षेत्रातील वनस्पती व प्राणी यांना हानी पोहोचली जाणार नाही याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

७) प्रकल्प यंत्रणा कमीत कमी वृक्षांची तोड करेल. एकूण वृक्षतोड प्रति हेक्टर ५० वृक्षांपेक्षा जास्त नसेल. प्रकल्प यंत्रणेला वृक्षतोडीमुळे झालेली हानी रकमेच्या स्वरुपात भरावी लागेल.

८) प्रकल्प यंत्रणा जिल्हाधिकारी यांचे विहीत नमुन्यातील अनुसूचित जमाती व इतर परंपरागत रहिवाशी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या प्रमाणपत्राची पूर्तता अंतिम मान्यतेपूर्वी करेल.

९) वरील परिच्छेद-१ मध्ये नमुद केलेल्या केंद्र शासनाच्या सर्व पत्रातील अटी व शर्तींच्या अधीन राहून ही तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली आहे व त्या अटींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक असेल.

१०) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना योग्य वाटतील अशा इतर अटी.

११) प्रकल्प यंत्रणेने उपरोक्त अटींची पूर्तता केल्यानंतर महाराष्ट्र शासन उक्त प्रयोजनासाठी वनजमिन वळतीकरणास अंतिम मंजुरी प्रदान करील आणि मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर हे वरील पूर्तता झाल्यानंतर प्रत्यक्षात वनजमिन वळतीकरणाची कार्यवाही करतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८२८१०२३१२६५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TIWARI VIRENDRA RAMBAHAL

Digitally signed by TIWARI VIRENDRA RAMBAHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917243, postalCode=400032, st=Maharashtra, cn=TIWARI VIRENDRA RAMBAHAL
Date: 2015.08.28 10:27:55 +05'30'

**( वीरेन्द्र तिवारी )**
**मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

**प्रत :**

१. सचिव (वने), पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मध्य), पश्चिम-मध्य विभाग, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर.
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
४. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. विभागीय आयुक्त, नागपूर
६. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
७. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर
८. विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर.
९. निवडनस्ती फ-१० कार्यासन

**Forest Land-Chandrapur**

Diversion of 4.99 Ha. of Zudpi Jungle Forest Land for Vocational Bamboo Research & Training Center at Chichpalli in Chandrapur District.

**Government of Maharashtra**

**Revenue and Forest Department**

**Government Resolution No.: FLD-3615/CR-195/F-10**

Mantralaya, Mumbai- 400 032

Date: 28/8/2015

**Introduction -**

Divisional Forests Officer, Chandrapur Forest Division, Chandrapur has submitted a proposal for diversion of 4.99 Ha. of Zudpi Jungle Forest Land for Vocational Bamboo Research & Training Center at Chichpalli in Chandrapur District to the State Forest Department. After careful consideration and scrutiny of the proposal, the Government is pleased to grant in-principle approval as under-

**Resolution -**

In exercise of powers delegated to the State Governments vide Government of India's order no. F.No. 11-9/98/FC, dated 13/05/2011 and 17/5/2013, Government of Maharashtra is pleased to grant in principle approval to the diversion of forest land under section 2 of the Forest (Conservation) Act, 1980, for Vocational Bamboo Research & Training Center at Chichpalli in Chandrapur District as per the proposal submitted by Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State vide its letter no. Desk -17/NC/I/I.D.-12383/466/15-16 dated 12/06/2015. The details are as given below:-

| **Chandrapur Forest Division** | | | | |
|---|---|---|---|---|
| **District** | **Village** | **Survey No./Gut No.** | **Area in Hectors** | **Legal Status** |
| Chandrapur | Chichpalli | 6/1 | 4.99 | Zudpi Jungle |
| **Total Forest Area** | | | **4.99** | |

2. This in-principle sanction is issued subject to the following conditions-

1) The legal status of the land required will remain unchanged.
2) The Project Authority will defray the cost of Net Present Value of 4.99 Ha. of Forest Land as per the latest guideline of Government of India.

3) The Forest land shall not be used for any other purpose other than specified in the project.
4) The proposed diversion of forest land for the project will be confined to 4.99 Ha. only.
5) As the project area is within 8.75 KM of the boundary of the Protected Area (Tadoba Andhari Tiger Reserve Boundary), the user agency will have to seek the permission of Hon'ble National Green Tribunal with respect to order dated 13/01/2014 in application No.135 (THC)/2013 [Shobhatai Phadanvis VS State of Maharashtra] before grant of work permission or diversion by the State Government.
6) It will be the responsibility of the User Agency to ensure that the laborers/staff engaged in other activity do not damage surrounding forest flora and fauna.
7) The User Agency will defray the cost of felling/removal of required trees. However minimum number of trees will be felled, and the number of trees to be felled should not be more than 50 trees per hector.
8) The User Agency will submit certificate under Schedule Tribes and Other Traditional Forest Dweller's (Recognition of Forest Rights) Act, 2006 duly approved by District Collector before final approval.
9) This in-principle approval is also subject to the terms and conditions mentioned in all the letters referred to in Para No-1 of this order and complying the same is binding on User Agency.
10) Any other condition which Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur may impose.
11) The Final approval shall be granted by the State Government after fulfillment of the above conditions by the User Agency. The actual diversion of forest land shall be effected thereafter by the CCF(T), Chandrapur.

This Government resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201508281023126519. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

TIWARI VIRENDRA RAMBAHAL

Digitally signed by TIWARI VIRENDRA RAMBAHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917243, postalCode=400032, st=Maharashtra, cn=TIWARI VIRENDRA RAMBAHAL
Date: 2015.08.28 10:28:15 +05'30'

**( Virendra Tiwari )**

**Chief Conservator of Forests (Mantralaya)**

**Copy forwarded to:**

1. Secretary (Forests), Ministry of Environment and Forests, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (C), West Central Regional Office, Ministry of Environment, Forests and Climate Change, Government of India, Nagpur.

3. Principal Chief Conservator of Forests (Head of Forest Force), Maharashtra State, Nagpur
4. Addl. Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur
5. Commissioner, Nagpur Region, Nagpur.
6. Collector, Chandrapur
7. Chief Conservator of Forests (T), Chandrapur.
8. Divisional Forests Officer, Chandrapur Forest Division, Chandrapur
9. Select File-F-10.